महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.५६९/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ५४६ दिनांक २४ / १० / २०१६

विषय : महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार म.रा.वि.वि.कं.म. मधील कर्मचाऱ्यांना दि.०१ जानेवारी २०१६ ते दि.३१ ऑगस्ट २०१६ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्याबाबत.

वाचा : १) सा.आ.क्र.११७ (क) दिनांक ३१.३.१९८६
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.५४४ दि.१९.०९.२०१६.

......

महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्र.मभवा-२०१६/प्र.क्र.४४/सेवा-९ दिनांक ०१.०९.२०१६ अनुसार वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या १२५ % या दराने महागाई भत्ता म.रा.वि.वितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना प्रशासकीय परिपत्रक क्र.५४४ दि.१९.०९.२०१६ अनुसार दि.०१.०१.२०१६ पासून लागू करण्यात आला असून सदर महागाई भत्ता सप्टेबर २०१६ च्या वेतनामध्ये समाविष्ट करुन देण्यात आलेला आहे.

२. आता राज्य शासनाच्या वित्त विभागाने शासन निर्णय क्र.मभवा-२०१६/प्र.क्र.४४/सेवा-९ दि.२०.१०.२०१६ अन्वये राज्य शासकीय व इतर कर्मचारी तसेच ज्यांना महागाई भत्ता अनुज्ञेय आहे अशा सर्व पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना दि.०१ जानेवारी २०१६ ते दि.३१ ऑगस्ट २०१६ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्यात यावी असे आदेश दिले आहेत.

३. शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जानेवारी २०१६ ते दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्याबाबत मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) आणि संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचार विनिमय करुन मंजुरी प्रदान केली आहे.

४. परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहे दि.०१ जानेवारी २०१६ ते दि.३१ ऑगस्ट २०१६ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम महावितरण कंपनीमधील कर्मचाऱ्यांना माहे ऑक्टोबर २०१६ मध्ये अदा करण्यात यावी.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

२४/१०

( संदेश हाके )
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

*D:\O&M\D.A-Adm.Circula*